## “गुणवंत शिक्षकेतर गट “ब” विद्यापीठ अधिकारी पुरस्कार” नियम व अटी.

१) हा पुरस्कार शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून सुरू करण्यात आलेला आहे.

२) १० फेब्रुवारी या विद्यापीठ वर्धापन दिनी पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

३) पुरस्काराचे स्वरूप- स्मृतिचिन्ह, रू.११,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे राहील.

४) पुरस्कार विद्यापीठामधील गट “ब”(तांत्रिक व अतांत्रिक) मधील सेवकांमधून देण्यात येईल.

५) अधिकारी सेवेत कायम असावा, अधिका-याची किमान १० वर्षे नियमित वेतनश्रेणीमध्ये सेवा झालेली असावी व त्यामध्ये खंड नसावा तसेच विद्यापीठामध्ये संबंधितांची गट “ब” मध्ये अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीच्या दिवशी किमान ०३ वर्षे विनाखंड नियमित वेतनश्रेणीमध्ये सेवा झालेली असावी.

६) लगतच्या पाच वर्षांच्या गोपनीय अहवालांपैकी किमान तीन वर्षांचे गोपनीय अहवाल “अ” दर्जाचे असावेत, अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७) पुरस्कार विभागून देता येणार नाही.

८) संबंधित अधिकाऱ्याने वैशिष्ट्यपूर्ण/नाविन्यपूर्ण कामगिरी विद्यापीठामध्ये कार्यरत असताना केलेली असल्यास त्यासंबंधीच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात.

९) संबंधित अधिकाऱ्यानी मागील १० वर्षांमध्ये शैक्षणिक पात्रता वाढविली असल्यास तसेच वैशिष्ट्यपूर्ण प्रशासकीय किंवा तांत्रिक कौशल्य आत्मसात केले असल्यास, त्याची विशेष नोंद घेण्यात येईल.

१०) पुरस्कारासाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीच्या दिवशी संबंधित व्यक्ती गट “ब” पदावर कार्यरत असावी.

११) विद्यापीठाच्या शैक्षणिक/प्रशासकीय विभागातील प्रमुखांनी त्यांच्या विभागातील गट “ब” मधील एकाच अधिका-याची या पुरस्कारासाठी शिफारस करावी. शिफारस करतेवेळी त्यांचे स्पष्ट अभिप्राय गोपनीयरित्या द्यावेत.

१२) अधिका-याने यापूर्वी प्राप्त केलेले पुरस्कार, बक्षीसे, विविध प्रशिक्षण वर्ग, विशेष कामासंदर्भात गौरविले असेल, त्या पुरस्कार/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक राहील.

१३) अधिका-यास संपूर्ण सेवाकाळात शिक्षा झालेली नसावी. त्यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी चालू नसावी किंवा कारवाई झाली नसावी किंवा कोणतेही आरोप ठेवलेले नसावेत.

१४) अधिका-यावर कोणताही नैतिक अधःपतनचा गुन्हा शाबीत झाला नसावा/चालू नसावा अथवा त्यांचेवर कोणतीही कारवाई चालू नसावी.

१५) अर्ज पाठविण्यापूर्वी मा. विभागप्रमुखांनी अर्जात नमूद केलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी. मा. विभागप्रमुखांनी दिलेली माहिती ग्राहय धरण्यात येईल.

